13 AUG 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि मातंग समाज' ग्रंथ उपयुक्त

## डॉ. शरद गायकवाड; विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर, ता. १२ : भूतकाळ व वर्तमान यांचे वास्तव स्वीकारून अण्णा भाऊ साठे महामंडळाच्या सद्यस्थितीला नवीन दिशा देण्यासाठी डॉ. उत्तम सकट लिखित 'अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि मातंग समाज' ग्रंथ उपयुक्त ठरेल, असा विश्वास डॉ. शरद गायकवाड यांनी आज येथे व्यक्त केला. डॉ. सकट यांचे संशोधन व लेखन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून प्रेरित झाले असून, त्यातून साकारलेला ग्रंथ समाजास दिशादर्शक ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. उत्तम सकट लिखित 'अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि मातंग समाज' ग्रंथाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापूर : डॉ. उत्तम सकट लिखित ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. गिरीष मोरे, डॉ. एस. एन. पवार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. सकट, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.

डॉ. शिर्के म्हणाले, 'डॉ. सकट यांनी या विषयावर पीएच. डी. करून ग्रंथ प्रकाशित केल्यामुळे महामंडळ आणि मातंग समाज यांच्यापुढे आदर्शवत स्वरुपाचे कार्य साकारले आहे.' डॉ. गिरीश मोरे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एन. पवार, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. दीपक भोसले, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. सयाजीराव गायकवाड उपस्थित होते. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
13 AUG 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नवीन शैक्षणिक धोरणाची अमंलबजावणी आवश्यक'

कोल्हापूर

सद्याच्या शिक्षण व्यवस्थेत परिधावर असणा-या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणासाठी अमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन शिवजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये नवीन बांधलेल्या कै. पुष्पा देशपांडे-राशिवडेकर या अत्याधुनिक सभागृहाच्या उद्घाटनाप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम होत्या.

कुलगुरू पुढे म्हणाले, "नविन शैक्षणिक धोरण हे शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांना स्वयंविकासाचे अवकाश खुले करून देणारे आहे. या शैक्षणिक धोरणातील ॲकॅडमिक बॅंक केडीट सिस्टिम विद्यार्थ्यांच्या विकासाला गती देणारी आहेत.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम यांनी पद्मश्री डॉ. आण्णांच्या दूरदृष्टीस अनुसरून महाविद्यालय विकास करत असल्याचे गौरवोद्गार काढले.



**कोल्हापूर :** सभागृहाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, रजनीताई मगदूम व इतर मान्यवर.

कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम म्हणाले, सद्याच्या सामाजिक घटनांचा विचार विवेक जागा ठेवून करावा व त्यांना सामोरे जावे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही ए. पाटील यांनी केले.

कार्यक्रमासाठी सभागृहाचे देणगीदार श्री. अचल कुलकर्णी व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संचालक मा. ॲड. वैभव पेडणेकर, मा. ॲड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. एस. जे. फाराकटे प्राचार्य डॉ. नारायणन उपस्थित होते. सुत्रसंचालन प्रा. सौ. अश्विनी मगदूम यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. बी. टी. नाईक यांनी मानले.

कॉमर्स कॉलेजच्या माजी प्राध्यापीका पुष्पा देशपांडे राशिवडेकर यांच्या स्मरणार्थ त्यांचे आत्येभाऊ श्री. अचल कुलकर्णी यांनी रू पंचविस लाख ची देणगी कौन्सिल ऑफ एज्युकेशनला दिली. याबद्दल अचल कुलकर्णी व त्यांच्या कुटुंबियांचा सत्कार कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम व सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते करण्यात आला.

13 AUG 2022
पुढारी
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर







# अमृतमहोत्सवी स्वातंत्र्याची रोषणाई

१) शिवाजी विद्यापीठ
२) जिल्हा न्यायालय
३) जिल्हाधिकारी कार्यालय
४) जिल्हा परिषदेची जुनी इमारत - कागलकर हाऊस.

(छाया : नाज ट्रेनर)



पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातर्फे 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'शिव-वार्ता' या यूट्यूब वाहिनीपाठोपाठ शिवाजी विद्यापीठाचा जनसंपर्क कक्ष आता 'शिव-वाणी' ही यूट्यूब ध्वनी-वाहिनी सुरू करत आहे. सोमवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि मान्यवरांच्या हस्ते या वाहिनीचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

या ध्वनी-वाहिनीद्वारे आजादी का अमृतमहोत्सव अर्थात भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना!' ही एक विशेष ध्वनी-मालिका सादर करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्ष यांची ही संयुक्त प्रस्तुती आहे. या मालिकेची सुरुवात शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील स्वातंत्र्यसैनिक दत्ताजीराव जाधव यांच्या कार्याच्या माहितीने दि. १५ रोजी सकाळी ९ वाजता करण्यात येणार आहे.

पुढारी

# विद्यापीठाची नवी ध्वनी-मालिका ‘अभिवादन स्वातंत्र्य सैनिकांना’ सोमवारपासून सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ ‘शिव-वाणी’ या यू ट्यूब ध्वनी-वाहिनीचे १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात येणार आहे. ध्वनी-वाहिनीद्वारे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ‘अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना!’ ही एक विशेष ध्वनी-मालिका सादर करण्यात येणार आहे.

विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जाणार आहे. मालिकेची सुरुवात शिरोळ तालुक्यातील सैनिक टाकळी येथील स्वातंत्र्यसैनिक दत्ताजीराव जाधव यांच्या कार्याच्या माहितीने १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता करण्यात येणार आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण मालिकेतून केले जाणार आहे. रोज सकाळी ९ वाजता स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्य व योगदानाचे स्मरण करण्यात येणार आहे.

लोकमत

# विद्यापीठाने स्थगित केलेल्या परीक्षांना गुरुवारपासून प्रारंभ

## उन्हाळी अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने दि. १० ते १३ ऑगस्ट दरम्यानच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या. या परीक्षा विद्यापीठाकडून गुरुवार (दि. १७) पासून घेतल्या जाणार आहेत. त्याबाबतचे सुधारित वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शुक्रवारी जाहीर केले.

पूरपरिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देणे शक्य नव्हते. त्यामुळे विद्यापीठाने चार दिवसांतील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा विद्यापीठाने स्थगित केल्या. या परीक्षा गुरुवारपासून सुरू होतील. परीक्षा मंडळाने शुक्रवारी विविध १९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले.

त्यात बी. एस्सी (सेमिस्टर) आणि सीबीसीएस, पी. जी. डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी हेल्थ, टुरिझम अँड ट्रॅव्हल, योगा थेरपी आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. उन्हाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारपासून पूर्ववत सुरू होतील, अशी माहिती परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठामध्ये डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या संयुक्त विद्यमाने भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम झाले. यावेळी ग्रंथालय माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. एस. बी. पाटील, ज्ञान स्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, सहायक प्राध्यापक डॉ. युवराज जाधव, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठामध्ये डॉ. रंगनाथन जयंती

**कोल्हापूर :** भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये शुक्रवारी प्रतिमा पूजन करण्यात आले. ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभाग आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम झाला. ग्रंथालय माहितीशास्त्र अधिविभागाचे प्रभारी विभागप्रमुख एस. बी. पाटील, ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डी. बी. सुतार, सहायक प्राध्यापक युवराज जाधव, उपग्रंथपाल पी. बी. बिलावर, सहायक ग्रंथपाल शिवराज थोरात आदी उपस्थित होते.